महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका-२०१७
बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीच्या अनुषंगाने
मतपत्रिकेचा नमुना.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२. दिनांक : ०३ जानेवारी, २०१७

## आदेश

क्रमांक रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र. ०८ /का.५ ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. आणि ज्याअर्थी, शासनाने "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश २०१६ (२०१६ चा अध्या. १६)" दिनांक १३ मे २०१६ व ३० ऑगस्ट २०१६ अन्वये महानगरपालिकांमध्ये (बृहन्मुंबई वगळून) एक सदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली असून त्या अनुषंगाने मतपत्रिका व इतर अनुषंगिक बाबींकरिता नव्याने आदेश पारित करणे आवश्यक झाले आहे.

३. त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४ (४) अन्वये तसेच आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन व आदेश क्रमांक रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.८/का.५, दि. २० सप्टेंबर, २०११ अधिक्रमीत करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे नव्याने आदेश देत आहे :-

३.१ **प्रभागातील जागांना क्रमांक देणे** – महानगरपालिका सदस्य पदाच्या निवडणुकांकरिता प्रत्येक प्रभागातील प्रत्येक सदस्य पदाच्या जागेला प्रभागाच्या क्रमांकासोबत यथास्थिती "अ" , "ब", "क"  "ड" किंवा "इ" अशा रितीने क्रमांक देण्यात येतील. उदा. प्रभाग क्र. १० मध्ये ३ जागा असतील तर त्या प्रभागातील जागांना १०अ, १०ब, व १०क असे संबोधण्यात येईल.

३.२ **नामनिर्देशनपत्र सादर करणे** - महानगरपालिका सदस्य पदाच्या प्रत्येक जागेसाठी वेगवेगळे नामनिर्देशनपत्र भरणे आवश्यक राहील. तसेच प्रत्येक जागेसाठी स्वतंत्र अनामत रक्कम भरणे आवश्यक राहील. एका जागेसाठी एका व्यक्तीकडून जास्तीत जास्त ४ नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येतील. एकाच जागेसाठी नामनिर्देशनपत्र स्वीकारताना अनामत रक्कम एकदाच स्वीकारण्यात येईल.

४. बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एक उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल. तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यास बंदी असणार नाही. एका उमेदवाराने एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास, छाननीच्यावेळी कोणत्या जागेची निवडणूक लढवायची आहे याविषयी उमेदवाराची लेखी इच्छा विचारात घेण्यात यावी. उमेदवाराने अशी इच्छा व्यक्ती न केल्यास प्रथमत: प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेण्यात यावे

५. **मतपत्रिकेचा रंग** – बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये मतदान यंत्रावर लावण्यात येणाऱ्या विविध जागांच्या मतपत्रिका मतदारांच्या चटकन लक्षात येण्यासाठी प्रत्येक प्रभागातील प्रत्येक जागेसाठी वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका लावणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक जागेच्या मतपत्रिकेचा रंग खालीलप्रमाणे राहील :-

१) प्रत्येक प्रभागातील "अ" जागेची मतपत्रिका - पांढरा रंग.

२) प्रत्येक प्रभागातील "ब" जागेची मतपत्रिका – फिका गुलाबी रंग.

३) प्रत्येक प्रभागातील "क" जागेची मतपत्रिका - फिका पिवळा रंग.

४) प्रत्येक प्रभागातील "ड" जागेची मतपत्रिका – फिका नीळा रंग.

५) प्रत्येक प्रभागातील "इ" जागेची मतपत्रिका – फिका हिरवा रंग.

६. **मतपत्रिकेचा नमुना** – महानगरपालिका निवडणुकांकरिता मतपत्रिकेचा नमुना परिशिष्ट- १ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे राहील.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन.
३) सर्व महानगरपालिका आयुक्त
४) सर्व जिल्हाधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने.
६) निवड नस्ती.

## परिशिष्ट-१

### (प्रभागातील "अ" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (पांढरा रंग)

क्र............  ................महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ....... जागा क्र. "अ"  (पद *)---------------

| | |
|---|---|
| १. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| २. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| ३. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| ४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA) | (NOTA) |

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचिल जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) /सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

---

## परिशिष्ट-१

### (प्रभागातील "ब" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका गुलाबी रंग)

क्र............  ................महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ....... जागा क्र. "ब"  (पद *)---------------

| | |
|---|---|
| १. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| २. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| ३. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| ४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA) | (NOTA) |

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) / सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

---

## परिशिष्ट-१

(प्रभागातील "क" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका पिवळा रंग)

क्र............ ................महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ....... जागा क्र. "क" (पद *)----------------

| | |
|---|---|
| १. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| २. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| ३. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| ४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA) | (NOTA) |

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) / सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

---

## परिशिष्ट-१

(प्रभागातील "ड" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका नीळा रंग)

क्र............ ................महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०---

प्रभाग क्र. ....... जागा क्र. "ड" (पद *)----------------

| | |
|---|---|
| १. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| २. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| ३. आसरे विलास अनंत | चिन्ह |
| ४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA) | (NOTA) |

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) /सर्वसाधारण / सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

---

## परिशिष्ट-१

**(प्रभागातील "इ" जागेच्या मतपत्रिकेचा नमुना) (फिका हिरवा रंग)**

क्र............ .................महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निवडणूक सन २०----

प्रभाग क्र. ......., जागा क्र. **"इ"** (पद *)-----------------

| | |
|---|---|
| १. आसरे विलास अनंत | **चिन्ह** |
| २. आसरे विलास अनंत | **चिन्ह** |
| ३. आसरे विलास अनंत | **चिन्ह** |
| ४. "वरीलपैकी एकही नाही" (NOTA) | (NOTA) |

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती / अनुसूचित जाती (स्त्री) / अनुसूचित जमाती / अनुसूचित जमाती (स्त्री) / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री) / सर्वसाधारण /सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

---